# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

CB 02/2025

## प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक ०५/०१/२०२६ |
|---|---|

**''वेश्याव्यवसायातुन ७ महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

.......................................................................................................................................................

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक ०३/०१/२०२६ रोजी त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, ''राज लॉजिंग अॅण्ड बोर्डींग, तुर्भेनाका, तुर्भे, नवी मुंबई येथील मॅनेजर हा लॉजमध्ये ग्राहकास ५०००/— रूपये घेवुन त्याने उपलब्ध केलेल्या महिला दाखवुन त्या महिलांकडुन वेश्याव्यवसाय करुन घेत आहे.

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास ''राज लॉजिंग अॅण्ड बोर्डींग'' मध्ये पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतिक इशाऱ्यावरून पथकाने लॉजवर छापा टाकला. त्याठिकाणी ०७ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळुन आल्या. लॉज मॅनेजर अजय कैलास गोस्वामी, महिला पुरवणारा किशोर पुर्णचंद्र साहु, वेटर अजयकुमार हिरालाल साव, लॉज चालक करूनाकर शेटटी यांनी पिडीत महिलांना प्राप्त करून त्यांना लॉजमध्ये ठेवल्या. मॅनेजर अजय गोस्वामी यांने महिलांना बनावट ग्राहकास दाखवुन बनावट ग्राहकाने पसंद केलेल्या महिलेस वेश्यागमनाकरीता पाठवल्याचा मोबादला म्हणुन ३५००/— रूपये बनावट ग्राहकाकडुन स्विकारले. आरोपी (१) लॉज मॅनेजर अजय कैलास गोस्वामी. (२) महिला पुरवणारा किशोर पुर्णचंद्र साहु. (३) वेटर अजयकुमार हिरालाल साव. (४) पाहिजे आरोपी लॉज चालक करूनाकर शेट्टी यांनी आपसात संगनमत करून ०७ पिडीत महिलांना वेश्याव्यवसायाकरीता प्राप्त करून नमुद लॉज वेश्याव्यवसायासाठी वापरला. म्हणून ४ आरोपीं विरूध्द तुर्भे पोलीस ठाणे येथे भान्यासं कलम १४३ (३), ३(५), सह अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम १९५६ कलम ३, ४, ५, अन्वये गुन्हा दाखल केला आहे. गुन्हयातील ३ आरोपींना दिनांक ०४/०१/२०२६ रोजी अटक केली असुन त्यांची दिनांक ०६/०१/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. पुढील तपास तुर्भे पोलीस ठाणे करत आहे

सदरची कारवाई सहा.पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/१३२ मांडोळे, पोहवा/२५०१ सविता म्हात्रे, पोहवा/२५०४ ज्योती अडकमोल, पोहवा/२५०७ मनिषा पावडे, चालक पोहवा/४८०६ मोहिते पोशि/३२३९ पारासुर, पोशि/३०६१ चव्हाण, पोशि/३४५२ राजकिरण कोलते, पोशि/४५४४ किशोर पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई
Galaxy S24 Ultra
04 January 2026 12:33 am